MAH/NAN/10936/2015
ISSN :2454-7905
SJF 2023 Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal




(A Peer Reviewed) Vol. 2- ISSUE- LXXVI, 11 Feb 2023

## साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक - प्रा. डॉ. प्रशांत भंडे

# अनुक्रमणिका


१. साहित्य समीक्षा व मराठी साहित्य - डॉ. नम्रता वागडे १०
२. समीक्षा संकल्पना आणि स्वरुप - संगीता सोमवंशी १५
३. साहित्य समीक्षा : संकल्पना व प्रकार - राजीव के.आरके. १८
४. साहित्य मानससंबंधांचा व्यूह सिद्ध करणारी समीक्षा - डॉ. अंकुशकुमार चव्हाण २३
५. मराठी साहित्यातील मार्क्सवादी संकल्पना - प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड २६
६. मराठी समीक्षेत समीक्षकांचे योगदान - प्रा. डॉ. संजीवकुमार सूर्यकांत पांचाळ ३०
७. समीक्षा प्रक्रिया - डॉ. अक्षय किशोर घोरपडे ३४
८. मराठीतील मार्क्सवादी साहित्य विचार - डॉ.अशोक नारनवरे ३७
९. एकविसाव्या शतकातील स्त्री समीक्षकांचे योगदान - प्रा.उषा सिताराम पाटील ४१
१०. १९७० च्या दशकातील दलित स्वकथनाचे स्वरूप - प्रा. डॉ. सुरेश व्यंकटराव कदम ४५
११. 'दलित साहित्या'च्या नामांतरामागील प्रयोजने आणि त्याची प्रस्तुतता
- डॉ. अश्विनी आत्माराम तोरणे ५०
१२. 'ग्रामीण साहित्य : संकल्पना व स्वरूप' - प्रा. सुरेश लक्ष्मण नजन ५६
१३. विविध वाङ्मय प्रवाहाचे विवेचन : ग्रामीण साहित्य - गीता किसन इंगळे ६१
१४. ना. धों. महानोराच्या कवितेतील कृषि तथा निसर्गप्रतिमांचे अनेकविध रुप
- प्रा.डॉ.बालाजी गणपतराव भंडारे ६६
१५. स्त्रीवाद - डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत ७०
१६. स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य - सौ. माया नितिन पठाडे ७४
१७. स्त्रीवादी चळवळ आणि साहित्य - प्रा. उज्ज्वला भोर ७७
१८. स्त्रीवाद : संकल्पना, स्वरुप व भारतीय स्त्रीवादाची परंपरा - प्रा. डॉ जगताप यु. एस. ८२
१९. आदिवासी साहित्य : व्याख्या, स्वरुप व संकल्पना - डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे ८५
२०. आदिवासी मावचीतील मौखिक संवाद (म्हणी व वाक्प्रचार) - गावित लता कथ्थू ८८
२१. सातपुड्यातील आदिवासी तडवीची लग्नगीते - मुकेश एकनाथ सावळे ९२
२२. आदिवासी कवी : देवेंद्र वसावे - डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे ९६
२३. देशीवाद आणि मराठी आदिवासी कविता - डॉ. संजय रमेश मेस्त्री १०१
२४. मुस्लीम मराठी साहित्य चळवळ एक शोध - प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे १०६
२५. पुनर्निर्मितीचा साक्षात्कार घडविणारे 'काव्यातील पांडित्य' - प्रा. डॉ. कैलास सलादे १०९
२६. कवी अजय कांडर यांच्या 'बाया पाण्याशीच बोलतात' या कवितेची समीक्षात्मक मांडणी
- सहा. प्रा. सौ संजीवनी सुरेश पाटील ११२
२७. माणूस असण्याःच्या नोंदी : व्यवस्थेला प्रश्न विचारणारी कविता - शरद ठाकर ११८
२८. वहिणावाई चौधरी यांच्या कवितेतील ग्रामीण स्त्री जीवन - प्रा. डॉ. मदकुंटे पी.एम. १२०

# १९. आदिवासी साहित्य : व्याख्या, स्वरूप व संकल्पना

डॉ. शर्मिला बाळसाहेब घाटगे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य प्रवाहामध्ये १९६० नंतर ग्रामीण साहित्य दलित साहित्य स्त्रीवादी साहित्य आणि अत्यंत महत्त्वाचा असा आदिवासी साहित्य प्रवाह नावारूपाला आला. या साहित्य प्रवाहाने समाजातील अनेक घटकांचा सूक्ष्मपणे वेध घेतलेला आहे. सामाजिक भान, समाजाचे होणारे विविध प्रकारचे शोषण, दलित ग्रामीण जनतेची होणारी पिळवणूक, नेमकेपणाने साहित्यामध्ये व्यक्त झालेली आहे. सुरुवातीपासूनच दलित ग्रामीण साहित्याचा आधार घेत आदिवासी साहित्य हे जन्माला आलेलं आहेआदिवासी जमातीत जन्म घेऊन जातीवंत आदिवासी साहित्यिकांचे अत्यंत वास्तववादी जीवन चरण कथा कविता कादंबरी आत्मचरित्र या साहित्य प्रकारात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्टे :**

१) आदिवासी समाजाच्या साहित्याचे स्वरूप समजावून घेणे,
२) आदिवासी जमातीचे सामाजिक सांस्कृतिक जीवन समजून घेणे,
३) आदिवासी जमातीच्या प्रेरणा समजून घेणे, आदिवासी संकल्पना समजावून घेणे
४) आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये पाहणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेला आहे. यासाठी आवश्यक संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके यांचा संदर्भ घेऊन सदर शोधनिबंध तयार केलेला आहे

आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवासी आहेत. यांनाच 'आदिवासी' या नावाने संबोधले जाते. आदिवासी म्हणजे नेमके कोण याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना अनुसूचित जमाती असेही म्हटले आहे. पण आज प्रशासकीय कामकाज आणि लोक व्यवहारात आदिवासी हा शब्दप्रयोग वापरला. आदिवासी साहित्य म्हणजे नेमके काय हे ठरविण्यासाठी खालील चार पर्याय लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

१) आदिवासी व्यक्तींनी लिहिलेले साहित्य
२) आदिवासींच्या जीवन संस्कृती समस्या इत्यादी बाबत आदिवासी किंवा गैर आदिवासी यांनी लिहिलेले साहित्य.
३) आदिवासी व्यक्तींनी आदिवासी बोलीभाषेतून लिहिलेले साहित्य
४) आदिवासींनी त्यांच्या मौखिक परंपरेतून जतन केलेले व आदिवासी किंवा गैर आदिवासींनी त्यांचे संकलन करून लिहिलेले साहित्य.

पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने आलेल्या लोकसाहित्यातून आदिम संस्कृतीचे जतन दर्शन आणि प्रकटीकरण हे होते. म्हणून डॉ. शैलजा देवगावकर यांना चौथा पर्याय महत्त्वाचा वाटतो.''[१] १९७९ साली चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती येथे आदिवासी साहित्यिकांचे पहिले संमेलन भरले व आदिवासी साहित्याचे नवे दालन उघडले गेले. १९७४ ते १९७५ या काळात उदयास आलेल्या चळवळी या सामाजिक समस्येला धरून होत्या ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनदर्शनाचे वास्तव चित्रण दिसत होते मात्र या आदिवासींचा स्वतंत्र विचार मांडला गेलेला नाही. १९६७ साली दलित साहित्याच्या चळवळीचा प्रचार आणि प्रसार झाला ही चळवळ गाव कुसाबाहेरच निर्माण झाली. त्यामुळे गाव कुसाबारील उपेक्षित असलेल्या समाज जीवनाचे दर्शन घडू लागले. या चळवळीपासून आदिवासींच्या मुक्ती व त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या संदर्भात फारच मोठी अपेक्षा होती. पण गाव कुसाच्या आतील समाज व्यवस्थेची विद्रोह करण्यातच ती कार्यरत राहिली मात्र आदिवासी समाज जीवन प्रपंच आणि संस्कृती यांचा उल्लेख केलेला नाही. परंतु दलित आणि आदिवासी ही दोघेही शोषित समाजजीवन शोषित असले तरी त्यांच्या दुःखाची कारणे व स्वरूप यामध्ये फरक आहे. असे आदिवासी साहित्यिकांचे मत आहे. या दोन वर्गामधला फरक आणि वेगळेपण मार्मिक शब्दात सांगितले आहे. "मागास समाजामध्ये व्यथा ही केवळ एका व्यक्तीची नसून ती त्या जनसमुद्याची सामूहिक व्यथा असते. विषमतेवर आधारलेल्या प्रत्येक समाज घटकाची व्यथा वेगळी अनुभूती वेगळी असते. दलितांचा अनुभव वेगळा आदिवासींचा अनुभव वेगळा, त्यांची संस्कृती वेगळी त्यांचा इतिहास वेगळा ते ज्ञानसंपदेला व सांस्कृतिक परंपरेला वंचित राहिलेले. दलित गावठी मध्ये राहिलेले आदिवासी समाजापासून अलग पडलेले त्यामुळे त्यांचा अनुभव हा वेगळा

साहित्याचे अस्तित्व अलीकडे फार मोठ्या प्रमाणामध्ये जाणू लागले आहे. मराठीमध्ये आदिवासी जीवनाचा पहिले उल्लेख केला. तो महात्मा
राहणारच त्यांचा आविष्कार वेगळाच असणार दलित साहित्य प्रमाणेच आदिवासींच्या साहित्याचे हे वेगळेपण मान्य केलेच पाहिजे."[२] आदि

यांनी

**गोंड, भिल्ल क्षेत्री होते. मूळ धनी ।**
**इराणी मागूनी आले येथे ।।[३]**

या आदिम जातीच्या वास्तव आणि त्याची सामाजिक दूरदर्शन यावर प्रकाश टाकला आहे. हळूहळू मराठी लेखकाने आदिवासी जीवन आ
आपल्या कथा कादंबऱ्यातून मांडल्या. तर स्वतःची अस्मिता आणि अस्तित्व जपण्यासाठी आदिवासी साहित्य परिषदेची स्थापना केली. प्र
आदिवासी जीवन प्रत्यक्ष जगलेले काही सुशिक्षित सुशिक्षित आदिवासी तरुण आपले स्वतःचे साहित्य लिहू लागले. तर दलित साहित्याकडून प्रे
घेऊन या आदिवासी लेखकांनी स्वतःचे साहित्य संमेलने भरवण्यास सुरुवात केली. आदिवासींचे पहिले साहित्य संमेलन चंद्रपूर दुसरे यवत
तिसरे नांदेड चौथे, धुळे पाचवे, ठाणे तर सहावी नाशिक या ठिकाणी भरवले गेले. येथील प्रत्येक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आदिवासी साहि
होते. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष माननीय कृष्णमूर्तीची मीरा मेश उद्घाटक वेतनामधली साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर आणि प्रमुख अतिथी प्र
प्राचार्य राम शेवाळकर होते. आपल्या संस्कृतीची एकनिष्ठ असलेल्या साहित्य स्वतःच्या भाषेत स्वतंत्र शैलीत समाज वास्तवाची जीवनदर्शन प्र
आणि सुलभ रीतीने मांडण्याचा प्रयत्न या आदिवासी समाजातील सुशिक्षित तरुण पिढीने केलेला दिसून येतो मिळणाऱ्या घटकांवर उपजीवि
करणारी आदिवासी संस्कृती आहे. दिवसभर शिकार करून कष्ट करून रात्री स्त्री पुरुष आभार वृद्ध एकत्र येऊन वेधुंदपणे नाच गाणे करत
चारा पानांची सळसळ आणि बासरी व ढोल यांच्या तालावर ते नाचतात. ही सांस्कृतिक जीवनशैली आपल्याला आदिवासींमध्ये पाहायला मि
अशाप्रकारे याचे संदर्भ आधुनिक आदिवासी साहित्यामध्ये आपणास दिसून येतात. लोक साहित्यामध्ये लोकगीते, लोककथा, लोकनाट्य विधी ना
म्हणी उखाणे कोडी मंत्र भगत, पुजारी प्रेरमा भूमिका अशांच्या अंगात संचारल्यानंतर त्यांच्या मुखातीतील बोल किंवा काही प्रसंगी दिल्या जा
शिवा यांचाही समावेश होतो. तर लिखित आदिवासी साहित्यामध्ये साधारणतः सत्तरच्या दशकानंतरच्या नवशिक्षित आदिवासी साहित्यिकांचे क
कथा, कादंवरी, नाटक, आत्मकथन यांचा समावेश यामध्ये होतो. याशिवाय आणखी एक तिसरा भाग म्हणजे आदिवासी समाज संस्कृती आदि
साहित्य व कला त्यांचे आर्थिक शैक्षणिक कौटुंबिक जीवन राहणीमान आदिवासी जमातींच्या विविध बोलींचे भाषा वैज्ञानिक संशोधन होय. आदि
साहित्य हे व्यापक स्वरूपाचे आहे. आदिवासींच्या विविध बोलीभाषा आहेत. परंतु त्यांना लिपीने नाही. लिपी शिवाय आदिवासी साहित्य हे आज
आदिवासी साहित्याचे स्वरूप आहे. प्रामुख्याने आदिवासींचे पारंपारिक लोकसाहित्य चा निर्देश होतो. पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने मुखात
संक्रमित होत असलेले आदिवासी वोलीभाषेतील लोकसाहित्य हेच खरे आदिवासी साहित्य होय असे शैलजा देवगावकर म्हणतात.जातो यासंदर्भ
गोविंद गारे म्हणतात, "आर्यांचे हिंदुस्तानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवासी होते. त्याकाळी आदिवासी टोळ्या टोळ्या
राहत होते. आर्य आणि हिंदुस्तान कावीज केल्यावर या टोयांपैकी पुष्कळ डोळ्यात आर्य लोकांशी समरस झाल्या काही टोळ्या पराभूत होऊ
तर काही टोळ्या स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी दराखोर यांच्या व जंगलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. भारतातील आदिवासींना त्या
गिरीजन असेही संबोधले जाते. मूळचे ते याच भूमीवरचे असल्यामुळे त्यांना भूमिजन किंवा भूमीच असेही देखील म्हणतात. नेहमी अरण्यात राह
म्हणून अरण्यक असे त्यांना संवोधण्यात येते. भारतीय संविधानाने त्यांना अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी किंवा आदिम जमाती संबोध
आहे."[४]

आदिवासी व्याख्या :

**प्रा. वामन शेळमाके :** 'आदिवासी साहित्य म्हणजे प्रामुख्याने गोंड राजगोंड परधान, माडिया, कोलाम, महादेव कोळी, भिल्ल, कोरकू वारली पार
बरडा गावीत धनवार पावरा वसावे अशा विविध जमातीचा समावेश आहे. आदिवासी म्हणणाऱ्या या जमातीची गुणवैशिष्ट्ये आहेत यांच्या जीवना
जे साहित्य आहे यासाठी आदिवासी साहित्य म्हणतो.'[५]

**डॉ. प्रमोद मुनघाटे :** 'आदिवासींच्या संदर्भातील भौगोलिक सामाजिक वंशिक व धार्मिक वृत्तकेची वृद्ध व्यक्तीची पृथकतेची जाणीव व्यक्त करणा
मराठी साहित्याचा आदिवासी साहित्य असे म्हणता येते.'[६] यावरील सर्व व्याख्या वरून असे लक्षात येते की, आदिवासी समाज हा नंतर आलेल्या
लोकांच्या आक्रमणामुळे पहाडी दुर्गम भागात वनात त्यांना जीवन जगणे भाग पडले आणि तो उपेक्षित वंचित राहिला. आधुनिक प्रगतीपासून दू
फेकला गेला. मागास रानटी क्रूर जंगली म्हणून त्यांची हेटाळणी झाली. पण मुळातशांत संयमी भोळा भाबडा उदार अंतकरण असलेल्या
आदिवासींच्या दुःखाची अभिव्यक्ती ज्या साहित्यातून होते ते साहित्य आदिवासी असा आपणास उल्लेख करता येईल. पण आदिवासी साहित्य

ज्यावेळी आदिवासी जाणीव व्यक्त होईल त्याच वेळेस खरे आदिवासी साहित्य जन्मास येईल. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. आदिवासीमध्ये भिन्नभिन्न जाती असून त्याची स्वतंत्र संस्कृती आहे. आदिवासी जमातीला एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे.आदिवासी स्त्री जीवनाचे विविध पैलू दिसून येतात. त्यामधून कौटुंबिकता मानसिकता, विवंचना, आर्थिकता, नैतिकता आणि रितीरिवाज यांचे अनोखे दर्शन घडते. आदिवासींच्या साहित्यातून आदिवासींच्या एकूण ४७ जाती आहेत. प्रत्येक जातीत पोट किंवा उपजाती आहेत. महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, नागपूर, भंडारा, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आदिवासींचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात दिसून येते.

आदिवासी साहित्य हे आशय आणि अविष्काराच्या दृष्टीने विपुल आणि वैविध्यपूर्ण आहे. अनादी काळापासून आदिवासींनी आपले लोक साहित्य मौखिक परंपरेने टिकवून ठेवलेली आहे. त्यांची सांस्कृतिक परंपरा वैभवशाली आहे. पण आज जागतिकीकरणाच्या काळात नवतंत्रज्ञानाचा परिणाम आदिवासींच्या लोक जीवनावर झालेला दिसून येत आहे. संगणक इंटरनेट मोबाईल इलेक्ट्रॉनिक अशा विविध प्रसार माध्यमांचा परिणाम खोलवर होताना दिसत आहे. आदिवासी समाजाच्या जुन्या रुढी परंपरा प्रथा या नष्ट होऊन नवीन वदलांना ते स्वीकारताना दिसत आहेत.

**आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये :**

आदिवासी जमात ही एका विशिष्ट प्रदेशात राहते.

१) हा भूप्रदेश एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या प्रदेशाच्या मानाने लहान असतो हा आदिवासी जमा इतर प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते रस्त्याच्या अभावाने तो प्रदेश दुर्गम असतो

२) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते

३) आदिवासी समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा त्यांचा मुखिया करतो.

४) आदिवासी जमातीची स्वतंत्र भाषा व बोली असते.

५) आदिवासी धर्मात निसर्ग पूजा व जादू सारख्या क्रियाकल्पास अत्यंत महत्त्व असते.

६) आदिवासी समाजात रूढी परंपरा व सामाजिक नियंत्रण यावर भर असल्याने सर्व लोकांच्या वागण्यासारखेपणा असतो त्यांच्या ठराविकच सवयी आणि चालीरीती असतात.

७) या समाजात एक एकजिनसीपणा जास्त आढळतो. आदिवासी समाज हा आर्थिक सामाजिक व धार्मिक जीवनबाह्य संपर्कापासून शतकानुशतके अलिप्त असल्याने स्वयंकेंद्रितता येणे स्वाभाविकच आहे. आदिवासी समाजात अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. पाटावरवंटा सापळे जाळी आकडे टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता यासारखी प्राथमिक अवजारेच त्यांच्याजवळ असतात.

८) आदिवासी समाज अर्थव्यवस्थेत नसतो. त्यांचं उत्पादन कमी असल्यामुळे त्यांच्या बाजारपेठही नसतात. प्रत्येक जण आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो.

९) त्यांची अर्थव्यवस्था वस्तू विनिमय स्वरूपाची असते

**समारोप :**

आदिवासी साहित्य आणि स्वरूप संकल्पना यांचे विवेचन करत असताना आदिवासी साहित्यातून आदिवासींची जीवन संस्कृती चे दर्शन होते.आदिवासी साहित्यामध्ये विगर आदिवासी साहित्यिकांनी सुद्धा साहित्य लेखन केलेले आहे.आदिम असणारा आदिवासी समाज निसर्गाच्या कुशीत आपली सुखदुखी आनंद समाधान मानणारा तसेच आपल्या रूढी परंपरा जतन करणारा आहे. मराठी साहित्य प्रवाहात आपल्या आदिवासी साहित्याची ठेवण एक वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचबरोबर त्याची बोलीभाषा ही वेगळ्या पद्धतीची आहे. दलित ग्रामीण स्त्रीवादी या साहित्याच्या बरोबरीने आज आदिवासी साहित्य आपली वाटचाल करत असल्याचे आपल्याला दिसत आहे. कार्ल मार्क्स, ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची बैठक ही आदिवासी साहित्याची प्रेरणा ठरत आहे.त्यामुळे आदिवासी साहित्याला एक स्वतंत्र ओळख प्राप्त झालेली दिसून येते.

संदर्भ : १) मुनघाटे, प्रमोद (संपा) : आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, 'प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती २००७, पृ.५२

२) तत्रैव : २१

३) तत्रैव : ४

४) गारे गोविंद : 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती,' अमृत प्रकाशन औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती- १९९३ पृ.१

५) शेळमाके वामन : 'उध्वस्त पाखरे' संपादक भोईर भगवान स्वप्नील प्रकाशन, भिवंडी, आवृत्ती पहिली १९९८ पृ.१२७

६) मुनघाटे, प्रमोद (संपा) : आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या,' प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००७.पृ.३